Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18852188

# हैद्राबाद मुक्तीसंग्रामात : आर्य समाजाचे योगदान

प्रा. डॉ. जाधवर बी. डी.[1]

**प्रस्तावना :-** हिंदुस्थानच्या इतिहासाचे विविध पैलू तपासले तर असे दिसते की या देशावर अनेक पाश्चिमात्यांची आक्रमणे आलेली होती. कारण या देशाचे महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे समाज ऐक्याचा अभाव भारतामध्ये असल्याचे दिसून येते. कारण डच, पोर्तुगीज, फ्रेंच, ब्रिटीश इत्यादी देशांनी या पावन भूमीवर आपले साम्राज्य प्रस्तापित करून काही काळासाठी या भागावर सत्ता स्थापन केली होती. भारतीयांची वाटेल त्या पध्दतीने सर्वच बाबतीत पिळवणूक करून त्यांना अधिकार हिन बनवले होते. इतर पाश्चिमात्यांचे जरी कमी कालावधीत या देशातून उच्चाटन झाले असले तरी इंग्रजाची राजवट मात्र कमी कालावधीत संपली होती. असे म्हणणे चुकीचे आहे. त्या राजवटीस उलथून टाकण्यासाठी भारतीय प्रबोधनकारांनी देशातील वेगवेगळया भागात प्रबोधनाचे कार्य हाती घेवून समाज जागृती घडवून आणलेली होती. त्यामुळे हतबल झालेला भारतीय समाज संघटीत होऊन आंदोलनाचे नेतृत्व करणा-या नेत्यांच्या मागदर्शनाखाली एकत्र येवून संघर्षासाठी उभा राहिला होता. त्यामळे देशात वेगवेगळी आंदोलने सुरु झाली. यामध्ये प्रामुख्याने असहकार आंदोलन, कायदेभंगाची चळवळ, भारत छोटो आंदोलन तसेच विविध पंथ, समाज, अस्तित्वात आले होते. परंतू या सर्वांना प्रेरणा मिळण्यासाठी खरा हातभार जर कोणाचा असेल तर इ.स. 1875 मध्ये स्वामी दयानंदानी स्थापन केलेल्या आर्यसमाजाचा हे सर्व मान्य आहे.

आर्यसमाजाच्या स्थापने नंतर स्वामी दयानंद सरस्वती यांच्या नेतृत्वाखाली अनेक अनुयायी आर्यसमाजाच्या कार्याला उंचीवर पोहचवण्यासाठी प्रयत्न क डिग्री लागले होते. त्याचा एक भाग म्हणून सर्वानुमते असे निश्चित झाले की, सत्याचा प्रभावी प्रकाश देणारे वैदिक तत्वज्ञान आचरणात आणल्याशिवाय भारत देशाला दुसरा पर्याय नाही. या विचाराने त्यांनी आपल्या कार्याला सुरूवात केलेली होती. त्यासाठी सर्वस्वाचा त्याग करून आपार कष्ट भोगण्यास तयार असलेल्या बुध्दीमान विचारवंत व प्रभावी वक्ते यांची एक फळी तयार करून सर्व भारतात जागृतीसाठीची मोहीम हाती घेतली होती. यामधूनच आर्यसमाजाच्या सदस्यानी हैद्राबाद मुक्ती आंदोलनात सुध्दा आपला सहभाग नोंदवला होता. म्हणजेच महत्वाची कामगिरी पार पाडली होती. त्याविषयीचा आढावा या शोधनिबंधात घेतला गेलेला आहे.

इ.स. 1875 मध्ये आर्यसमाजाची स्थापना झाल्यानंतर दिवसें दिवस आर्यसमाजाचे कार्य प्रगतीवर पोहचवणा-या अनुयायीची संख्या वाढत होती. त्यामुळे देशाच्या कानाकोपा-यात वरील विचारांचे कार्य वाढत चालले होते. भारतातील हैदराबाद या संस्थानात इ.स. 1920 मध्ये आर्यसमाजाची स्थापना होवून या राज्यात अतिशय योग्य पध्दतीने

[1] इतिहास विभाग प्रमुख, बलभीम महाविद्यालय, बीड

आर्यसमाजाची कार्य करणा-या जवळपास 200 ते 300 शाखा हैदराबाद या संस्थानात कार्यरत होत्या. 1941 च्या जनगणनेनुसार हैदराबाद राज्यात आर्य समाजी लोकांची संख्या 40000 हजारावर होती. म्हणजेच या समाजाचा विस्तार हा तेलंगणा, कर्नाटक, मराठवाडा या तीन विभागांच्या तुलनेत पाहिला तर जास्तीचा प्रभाव मराठवाड्यात दिसत होता. यामध्ये पण मराठवाड्यातील उस्मानाबाद आणि नांदेड या ठिकाणी जास्त जाणवतो. एकंदर हैदराबाद संस्थानात एकमेव आर्यसमाज ही एकमेव संघटना अस्तित्वात होती. वरील संस्थानात 1920 मध्ये संघटनेची स्थापना झाली. तेंव्हा हैदराबादचे बॅ. विनायकराव कोरटकर हे आर्य समाजाचे अध्यक्ष होते. तर बन्सीलालजी मुख्यमंत्री होते. त्यांनी उदगीर येथे आर्यसमाजाचे मुख्य कार्यालय उघडून वैदिक संदेश नावाचे वृत्तपत्र सोलापूर येथून प्रसिध्द करण्यास सुरुवात केलेली होती. ते वृत्तपत्र निजामराज्यात सर्वत्र पोहचवण्याची व्यवस्था केलेली होती. वरील संघटना ही अतिशय शिस्तबध्द व ध्येयवादी विचाराची संघटना म्हणून आर्यसमाज संघटनेकडे पाहिले जाऊ लागले. मायभूमीवरील प्रेम आणि वैद्यीक धर्मावरील निष्ठा या दोन उद्दिष्टासाठी प्रत्येक आर्यसमाज आपल्या प्राणांची बाजी लावण्यास तयार असतो. याची प्रचीती हैदराबाद मुक्ती आंदोलनाच्या माध्यमातून दिसून आली.

**वेदप्रकाशचे बलीदान :-** आर्यसमाज चळवळीला गतीमान करण्यासाठी देशातील अनेक तरूणांनी आत्मबलीदान अर्पन करण्याचा निर्णय घेतला होता. त्यापैकी वेदप्रकाश आर्य हा एक तरूण होता. त्याचे मुळ नाव दासप्पा शिवबसप्पा हर्के हे होते. इ.स. 1917 मध्ये त्याचा जन्म झालेला होता. वयाने अतिशय कोवळा असलेल्या वेदप्रकाश या तरूणाने वयाच्या 20 व्या वर्षीच हैदराबाद संस्थानच्या मुक्ततेसाठी पहिले आत्मबलीदान देऊन इतिहासात आपले नाव अजरामर केले होते. 23 फेब्रुवारी 1937 रोजी भाई बन्सीलालजीचे आगमन गुंजोटी या गावात होणार होते. त्यांच्या स्वागताची तयारी जोरात सु डिग्री केली. गुंजोटी परिसरातील औदार, केदार, तुगाव, जागीर, चिंचोली या गावातील सर्व आर्यसमाजी मंडळी गुंजोटीमध्ये एकत्र येऊन ‘जो बोले सो अभय वैदिक धर्म की जय” अशा घोषणांनी एकत्रीत झालेली होती. यावेळी वेदप्रकाश भाई बन्सीलालजीना घेवून जाण्यासाठी सकाळीच उमरग्याला गेला होता. परंतू संध्याकाळ पर्यंत तो तेथेच त्यांची वाट पाहत बसला. त्यामुळे एकत्रीत आलेली आर्यसमाजी मंडळी आपआपल्या गावी निघून गेले. तेंव्हा इत्तेहादूल संघटनेतील गंुडानी गावामध्ये धुमाकूळ घालण्यास सुरूवात केली होती. भाई बन्सीलालजी शेवटच्याही बसने आले नाहीत. त्यामुळे वेदप्रकाश संध्याकाळी गुंजोटीतल्या आपल्या घरी गेले.जेवण केले. यावेळी दिवसभरात गावात काय घटना घडल्या होत्या. याची माहिती त्याला नव्हती. याच वेळेत ‘वेदिक धर्म की जय’ अशी घोषणा ऐकू आली. भाई बन्सीलालजी आलेली काय असे वाटले म्हणून तो घराबाहेर पडला. तेंव्हा त्याला समोरून फार मोठा पठाण अरबांचा जमाव दिसला. या पठाणांच्या मनामध्ये वेदप्रकाश विषयी अतिशय चिड होती. तो दिवस नागदिव्यांच्या सणांचा आदला दिवस होता. गावामध्ये दुपारी जो मुस्लीम संघटनांनी गोंधळ घातला होता. त्यामुळे सर्व गाव अगदी शांत होते. केवळ एकटा वेदप्रकाश फक्त बाहेर आलेला होता. तोच पठाणांच्या ताब्यात सापडला. तेंव्हा पठाणांनी त्याचे शिर धडावेगळे करून त्याला ठार मारले होते. नंतर मात्र

या गोंडस तरूणांच्या मृत शरीराशेजारी शेकडो माणसांचा जमाव जमा झालेला होता. भाई बन्सीलालजी आणि वीरभद्रजी आर्य हे पण त्याठिकाणी आले होते. उपस्थित जमावाला वेदप्रकाश अतिशय प्रिय होता. अशा प्रिय तरूणाने वयाच्या 20 व्या वर्षी देश सेवेसाठी आत्मबलीदान करून नाव इतिहसात अजरामर केले. या घटनेमूळे सर्व हैदराबाद संस्थान दु:ख सागरात बुडाले. तेंव्हा या घटनेपासून नागपंचमीसाठी सासरहून गुंजोटीला माहेरी आलेल्या सर्व मुली भुलईचा फेरा धरून बंधु वेदप्रकाश वरील गीत गाऊ लागल्या होत्या. वेदप्रकाशच्या विचाराने किंवा बलीदानाने आर्यसमाज चळवळ गतीमान होऊन हैदाराबादमुक्ती चळवळीस गती मिळाला हे विसरता येणार नाही.

**भाई शामलचे बलीदान :-** इ.स. 1938 मध्ये सोलापूर येथे आर्य प्रतिनिधी सभेचे कार्यालय स्थापन करण्यात आलेले होते. याठिकाणी सर्व हैदराबाद राज्यातील आर्यसमाजी लोकांना सोलापूर येथील अधिवेशनाला उपस्थित राहण्याविषयी कळवण्यात आले. त्यामुळे हजारो कार्यकर्ते सोलापूरकडे मार्गस्थ झाले होते. दिल्ली येथून स्वातंत्र्यानंदजी, नागपूरहून लोकनायक बापूजी आणे, पुण्याहून सावरकार, पंजाबहून नारायण स्वामी श्री. लाल खुशालचंद खुरसंद यादी नेते आमंत्रीत होते. वरील अधिवेशनाच्या बातमीने आणि आर्यसमाजी प्रतिनिधींच्या प्रतिसादमुळे निजामी अधिकारी संतप्त झालेले होते. त्यांनी दहशत निर्माण करण्यासाठी बिहार जेलमध्ये असलेल्या शामलालजींना हालहाल करून ठार मारले. ही बातमी सोलापूरमध्ये वा-यासारखी पसरली. पंडीत शामलालजींचा मृतदेह ताब्यामध्ये घेऊन तो सोलापूरमध्ये दाखल केला. तेव्हा त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी हजारो आर्यसमाजी लोकांच्या रांगा लागल्या होत्या. त्यांच्या अंत्यविधी कार्यक्रमानंतर दुस-या दिवशी सोलापूर येथे नियोजीत अधिवेशन सु डिग्री झाले. पं. शामलालजींच्या बलीदानामुळे या अधिवेशनाला नवचैतन्य प्राप्त झाले होते या अधिवेशनात लोकनायक बापूजी आणे आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी अतिशय स्फुर्तीदायक भाषणे केली. निजामी राजवट उलथून टाकण्यासाठी उठाव केल्याशिवाय पर्याय नाही, हे त्यांनी आर्यसमाजींना ठासून सांगितले. या सर्व घटनाचा सखोलपणे उहापोह झाल्यानंतर असे ठरले की, हिंदू महासभा आणि आर्यसमाज या दोघांनी मिळून महात्मा गांधीजीच्या अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग अंगीकारून हैदराबाद मुक्ती आंदोलनात आपले योगदान देण्याचे घोषीत केले होते.

**आर्यसमाज आणि सत्याग्रही चळवळ:-** हैदराबाद मुक्ती आंदोलनाचे आर्य समाजी सत्यागृह 24 ऑक्टोबर 1938 पासून सु डिग्री होवून तो 7 ऑगस्ट 1939 पर्यंत सातत्याने 10 महिने चालू होता. हैदराबाद संस्थानाचे प्रमुख सर अकबर हैदरी यांनी तो पत्रव्यवहार केला होता. त्या पत्रामध्ये आर्यसमाजी सत्याग्रहाची संख्या जवळपास 12000 हजार एवढी दिलेली होती. यामध्ये बहुसंख्य नागरीक हे संस्थानाच्या बाहेरील होते. हैदराबाद मधील फक्त 3000 ते 3500 एवढेच होते. या समाजाच्या सत्याग्रहाची मर्यादा ही धर्म आणि धार्मिक हक्क एवढ्या पर्यंतच मर्यादित केलेली होती. परंतू यामध्येच त्यांनी आपल्या आंदोलनास अखिल भारतीय स्वरूप प्राप्त करून दिलेले होते. म्हणजेच देशाच्या कानाकोप-यामधून अनेक आर्यसमाजी सत्याग्रही भारतात आलेले होते. श्री.नारायण स्वामी हे आर्य प्रतिनिधी सभेच्या पहिल्या तुकडीचे सुत्रधार होते. त्यांनी 31

जानेवारी 1939 रोजी सर्वंासमवेत हैदराबाद संस्थानात सुत्रधार प्रवेश केला. परंतू त्यांना अटक झाली. नंतर त्यांना अटक करून सोलापूरला आणून सोडले होते. त्यांना गुलबर्गा येथे तुरूंगात डांबण्यात आले. तेंव्हा सर्व देशातील आर्यसमाजाच्या वतीने सत्याग्रहाची मोहीम सु डिग्री झालेली होती.

एकंदर वरिल प्रमाणे आर्यसमाजी लोकांना हैदराबाद मुक्ती आंदोलनासाठी आपले सर्वस्व अर्पण केले आणि तो संघर्ष किंवा लढा तीव्र होऊन आर्यसमाजाच्या अहिंसात्मक सत्याग्रही मार्गाचा धक्का संस्थानीकांना बसलेला आहे, हे या शोध निबंधात मी घेतलेले आहे.

**संदर्भ सूची :-**


1. प्रा.डॉ. सोमनाथ रोडे, मध्ययुगीन भारताचा राजकीय आणि सांस्कृतीक इतिहास.
2. संपा. प्रा.भगवान काळे मराठवडा काल आणि आज.
3. संपा. डॉ. अशोक प्रभाकर कामत, वीरशैव संत साहित्य- अभ्यासग्रंथ
4. अनंत भालेराव - हैदराबादचा स्वातंत्र्य लढा आणि मराठवाडा मुक्तीसंग्राम
5. संपा- विनायकराव चारठाणकर- हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम, परभणी जिल्ह्याचे योगदान
6. स्वामी रामानंद तिर्थ- हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी
7. भुजंगराव कुलकर्णी- मराठवाड्याचा विकास अभ्यास व चिंतन.


**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*